**—: प्रेस नोट :—** दिनांक २७/०५/२०२२

**लो.टी.मार्ग पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी झवेरी बाजारात घातक अग्निशस्त्रासह दरोडा सारखा गंभीर गुन्हा होणेअगोदरच आरोपीतास अटक करुन गुन्हयास प्रतिबंध करुन गुन्हा घडण्यापुर्वी सराईत दरोडेखोरांना ०३ अग्निशस्त्रांसह पकडून मुंबई पोलीसांचे नावलौकीकास साजेशी अशी उत्तम कामगिरी केल्याबद्दल.**

लो.टी.मार्ग पोलीस ठाण्यास गोपनीय यंत्रणेकडुन माहीती प्राप्त झाली की, पोलीस ठाणे हद्दीतील झवेरी बाजार, दागिना बाजार या परिसरात राजेश नावाचा इसम त्यांच्या साथीदारांसह दरोडा टाकण्याचा तयारीत आहे. त्याने परिसरात रेकी केलेली असुन २ ते ३ दिवसांत दरोडा टाकुन सोन किंवा पैसे लुटणार आहे. नमुद इसमांकडे घातक अग्निशस्त्र असुन अग्निशस्त्राचा उपयोग होवु शकतो. वरील माहीतीच्या आधारे मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दयानंद जाधव यांनी पोलीस ठाणेतील पथकाच्या मदतीने तांत्रिक तपास सुरु केला असता राजेश नावाच्या इसमांची सखोल माहीती काढली व दिनांक २६/०५/२०२२ रोजी सपोनि दयानंद जाधव, सपोनि दिनकर इलग, पोउनि लाड, पोउनि दत्तात्रय जाधव व पथकाने लो. टि. मार्ग पोलीस ठाणे हद्दीतील झवेरी बाजार, मुंबई येथे दरोडा घालण्याकरीता ७ ते ८ इसम येणार असून, त्याची पुर्वतयारी करण्याकरीता ते सर्वजण मरीन लाईन्स रेल्वे स्टेशन समोर स. का. पाटील उद्यान परिसरात भेटणार असल्याची खात्रीलायक खबर गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त झाली होती. सदर खबरीच्या अनुषंगाने मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स.का. पाटील उद्यान परिसरात सापळा रचण्यात आला. सदर गुप्तबातमीची शहानिशा करून कारवाई करण्याचे आदेश प्राप्त झाले.

सुमारे २१:१० वा सुमारास एक इसम एम. के. रोड, मरिन लाईन्स स्टेशनसमोरील रस्त्यावरून स. का. पाटील उद्यानाच्या उत्तर बाजूस भाई जीवनजी लेन, मुंबई-४०० ००२ येथे उभा राहीला तसेच थोडयाच वेळात आणखी दोन इसम त्या ठिकाणी आले. सदरचे इसम आजूबाजूला बघत होते व इतर कोणाची तरी वाट पाहत संशयास्पद हालचाली करीत होते. सदरवेळी सपोनि दयानंद जाधव यांनी केलेल्या इशाऱ्यावरून नेमलेल्या पथकातील पोलीसांनी सदर तिन्ही इसमांना घेराव घालून अटकाव करून बळाचा वापर करून ताब्यात घेतले. त्यावेळेस पथकापासून दुर थांबलेले दोन इसम अंधाराचा फायदा घेऊन एम. के. रोडच्या दिशेने पळून गेल्याचे दिसून आले.

नमूद वेळी पोलीसांनी ०३ व्यक्तींना ताब्यात घेतले - १) राजेश बौध्दू राय, वय ३४ वर्षे, २) सोनू उर्फ अमित बब्लू चौधरी, वय २३ वर्षे, ३) संजय पाचकडी दत्ता, वय ३३ वर्षे

नमूद व्यक्तींना अटकाव करण्यात आले नंतर दोन पंचासमक्ष अंगझडत घेण्यात आली त्यातील राजेश राय याच्या पाठीवरील बॅगमध्ये **देशी बनावटीचे एक लोखंडी पिस्टल व मॅटेलिक सिल्वर रंगाचे फायबर व धातुच्या बनावटीचे पिस्टल सारखे दिसणारे दोन लोखंडी पिस्टल** आणि त्याचे वापरते मोबाईल व आधार कार्ड पंचनाम्यादरम्यान ताब्यात घेण्यात आले.

सदर तिन्ही इसमांना अधिक चौकशीकरीता योग्य त्या बंदोबस्तामध्ये पोलीस ठाण्यास आणून त्यांचेकडे करण्यात चौकशीमध्ये त्यांनी त्यांचे साथीदार राजकुमार व रविंदर सिंग (दोघेही राहणार दिल्ली) यांचेसह इतर ०२ साथीदार यांचेसह झवेरी बाजारातील ४ ते ५ सोन्याचे दुकानाची रेकी करून गेले होते व त्याठिकाणी दरोडा घालण्याची तयारी करण्याकरीता एकत्र जमले असल्याचे सांगितले म्हणून त्यांचे विरोधात पो.ना. क्र. ०४०५६४ / संभाजी तुकाराम चौगुले यांनी सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद दिल्याने गु.र.क्र.५६३/२२ कलम ३९९ भादंवि सह कलम ३, २५ भा.ह.का. सह कलम ३७(१)(अ), १३५ म.पो.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हयातील अटक करण्यात आलेल्या आरोपींतांचा अभिलेख तपासला असता, त्यांचेविरोधात मुंबई, दिल्ली याठिकाणी जबरी चोरी, चोरी, दरोडा यासारखे गंभीर गुन्हे नोंद आहेत.

**सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. संजय पांडे यांचे मार्गदर्शनाखाली व मा. पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था, बृहन्मुंबई श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई श्री. दिलीप सावंत, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, मुंबई श्री निलोत्पल यांच्या देखरेखीमध्ये मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,पायधुनी विभाग,मुंबई श्री. समीर शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती ज्योती देसाई यांच्या नेतृत्वात तसेच पोलीस ठाण्यातील सपोनि दयानंद जाधव, सपोनि दिनकर इलग, पोउनि प्रदीप लाड, पोउनि दत्तात्रय जाधव, पो.ह.क्र. ३३२७१/गोसावी, पो.ना.क्र.९७०८०६/पाटील, पो.ना.क्र. ०१५६८/कांबळे, पो.ना.क्र. ०११६४/ परूळेकर, पो.ना.क्र. ०४०५६४/चौगुले, पो.ना.क्र. ०६१६२७/राऊत, पो.शि.क्र. ०७१४६३/महाजन, पो.शि.क्र. ०८०६८४/गुजर, पो.शि.क्र. ०९२२२३/बगळे, पो.शि.क्र. ०९१०३०/साळुंखे, पो.शि.क्र. १३०४३९/ अहिरराव यांनी रात्रंदिवस अथक परिश्रम घेवून घातक अग्निशस्त्रासह दरोडा यासारखा गंभीर गुन्हा होणेअगोदरच आरोपीतास अटक करुन गुन्हयास प्रतिबंध करुन गुन्हा उघडकीस आणून मुंबई पोलीसांचे नावलौकीकास साजेशी अशी उत्तम कामगिरी केलेली आहे. मुंबई पोलीसांनी तपासामध्ये दाखविलेली कौशलता व कार्यतत्परता यामुळे नमूद गुन्हयाचा प्रतिबंध केल्याने मुंबई पोलीसांचे मुकुटात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.**